आरोग्य सेवा आयुक्तालय,.
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई.-०१

| कार्यालय | दुरध्वनी | Website : http:/arogya.maharashtra.gov.in |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Email : dhsdesk1@gmail.com |
| सहसंचालक (अर्थ व प्रशासन) | २२६२११८६ | Email : caodhs.mumbai@gmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | Fax No. ०२२-२२६२१०३४ / २२६२०२३४ (DHS) |


| स्मरणपत्र | क्र.आसेआ/कक्ष-१/टे-१/ जुनी निवृत्ती वेतन योजना / ३४८१-३५०४ / २४, दिनांक-०४ जुलै २०२४ |
|---|---|

प्रति,
कार्यक्रम प्रमुख (सर्व),
उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व),

विषय- दि. ०१/११/२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/ अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत.

संदर्भ- १) वि.वि.शा.नि.क्रं. संकिर्ण -२०२३/ प्र.क्र.४६/सेवा-४, दिनांक- ०२/०२/२०२४.
२) आयुकतालयाचे परिपत्रक क्रं. आसेआ/ कक्ष-१/टे-१/ जुनी निवृत्ती वेतन योजना/ २८४४-६६/२४, दिनांक- ३०/०५/२०२४.

उक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये दि. ०१/११/२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/ अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१/११/२००५ रोजी किंवा त्यांनतर रुजू झालेल्या शासकिय अधिकारी/ कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात आलेला आहे.

तद्नुसार आयुक्तालयाच्या संदर्भ क्रं. २ चे परिपत्रकान्वये आपणांस अधिनस्थ कार्यालयातील दि. ०१/११/२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/ अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी म.वै.आ.से. गट-अ, वर्ग-१ मधील जे अधिकारी शासन सेवेत दि. ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेले आहेत, अशा शासकिय अधिका-यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासह विहीत मुदतीत आयुक्तालयास सादर करणेबाबत कळविले होते.

उक्त नमूद शासन निर्णयानुसार संबंधित राज्य शासकिय अधिकारी/ कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा सदर पर्याय हा सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे राज्य शासकिय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली ( NPS) लागू राहील. राज्य शासकिय अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील असे नमूद असल्याने सदर शासन निर्णयाची मुदत लवकरच संपुष्टात येणार आहे.

( कृ.मा.प.)

Scanned with OKEN Scanner

सबब आपणांस पुनश्च कळविण्यात येते की, उक्त संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन आपल्या अधिनस्थ कार्यालयातील दि. ०१/११/२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/ अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी म.वै.आ.से. गट-अ, वर्ग-१ मधील जे अधिकारी शासन सेवेत दि. ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेले आहेत, अशा शासकिय अधिका-यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासह तात्काळ आयुक्तालयास सादर करावेत. प्रस्ताव विहीत मुदतीत सादर न केल्यास अशा अधिका-यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली ( NPS) लागू राहील व त्याची संपूर्णत: जबाबदारी सबंधित अधिकारी व आपले कार्यालयाची राहील याबाबत कृपया नोंद घ्यावी.

(तुळशीदास सोळंके)
सहसंचालक आरोग्य सेवा
( अर्थ व प्रशासन) मुंबई

Scanned with OKEN Scanner